पशुआरोग्य

# दुधाळ जनावरांमधील महत्त्वाचे आजार आणि प्रतिबंधात्मक उपाय




**डॉ. सय्यद अब्दुल मुजीब**
(मो.नं. ७५८८६१३१६२)
चिकित्सालय निबंधक (पशु औषधीशास्त्र)
**डॉ. प्रशांत माने**
**डॉ. तोहीद अहेमद शफी**
**डॉ. महारूद्र सानप**
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी








दुग्ध व्यवसाय करताना पशुपालकास दुग्ध व्यवसायातील बारकावे आणि शास्त्रीय माहिती असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे कळपात रोगाची लागण झाल्याचे पशुपालकांच्या लवकर लक्षात येईल व होणारे आर्थिक नुकसान टाळता येईल. या विविध रोगांच्या संदर्भातील माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे.

**प**शुपालकास दुग्ध व्यवसायातील बारकावे आणि शास्त्रीय माहिती असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे कळपात रोगाची लागण झाल्याचे पशुपालकांच्या लवकर लक्षात येईल व होणारे आर्थिक नुकसान टाळता येईल. जनावरे रोग झाल्यावर औषधोपचाराला चांगला प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे रोग झाल्यावर औषधोपचार करण्यापेक्षा रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

**लाळ्या-खुरकुत**

लाळ्या-खुरकुत हा संसर्गजन्य आजार असून, हा रोग ऑप्थो व्हायरसमुळे होतो. या विषाणूचे उपप्रकार असून भारतात चार उपप्रकार आढळतात. सामान्यपणे हा आजार विभागलेली खुरे असलेल्या किंवा रवंथ करणाऱ्या जनावरांमध्ये प्रामुख्याने आढळतो. हा अतितीव्र स्वरूपाचा



आजार आहे. या आजारात मरतुकीचे प्रमाण कमी असून रोगग्रस्त जनावरांची भविष्यातील उत्पादन व प्रजननक्षमता घटते. तसेच काही जनावरे पायातील जखमांमुळे कायमस्वरूपी लंगडतात व त्यामुळे पशुपालकांचे आर्थिक नुकसान जास्त प्रमाणात होते. देशी जनावरांच्या जातीपेक्षा संकरित जनावरांना हा रोग जास्त प्रमाणात होतो. बाधित जनावरांपासून या रोगाचा विषाणू हवा पाणी, खाद्य इत्यादींमार्फत निरोगी जनावरांना प्रादुर्भाव करतो. हा विषाणू वाऱ्याबरोबर अंदाजे २५० कि.मी. पर्यंत जाऊ शकतो. बाधित जनावरे रोगवाहक म्हणून कार्य करतात.

**लक्षणे** : या रोगात सर्वात महत्त्वाचे लक्षण म्हणजे तोंडातून लाळेची तार गळते. तोंड, जीभ, हिरड्या, कास इत्यादींवर लालसर रंगाचे फोड येतात. यामुळे जनावर काहीच खाऊ शकत नाही. चोवीस तासात ते फोड फुटतात व तेथे चट्टे दिसतात. तसेच खुरात जखमा होऊन जनावरे लंगडत चालतात. रोगग्रस्त जनावरांना उच्च ताप असतो व गाभण जनावरे गाभडतात. भूक मंदावल्यामुळे जनावराला अशक्तपणा येतो.

**उपचार** : पशुवैद्यकाच्या सहाय्याने त्वरित उपचार करून घ्यावा. रोगग्रस्त जनावरास लसूणघास, कोथिंबिर इत्यादीसारखा लुसलुशीत चारा व गुळाचे किंवा साखरेचे पाणी द्यावे.

**प्रतिबंधात्मक उपाय** : जनावराचे स्थलांतर टाळावे. बाजारातून नवीन जनावर आणल्यास त्यांना हा रोग नसल्याची खात्री झाल्यानंतर त्यांना कळपात सोडावे. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने रोगग्रस्त जनावर निरोगी जनावरांपासून वेगळे ठेवावे. रोगप्रतिबंधक लस वर्षातून दोनदा टोचून घ्यावी.

**घटसर्प**

घटसर्प हा रोग जनावरांमध्ये सर्व ऋतुंमध्ये आढळतो पण पावसाळ्यात याचा प्रादुर्भाव होण्याचे प्रमाण अधिक आहे. हा रोग पाश्चुरेला मल्टोसिडा या जिवाणूमुळे होतो. हा रोग श्वसनसंस्था तसेच आतड्यांशीही संबंधित आहे. हा रोग सर्व वयोगटाच्या जनावरांमध्ये आढळून येतो. या रोगाचा प्रसार मुख्यत्त्वे करून बाधित झालेल्या जनावरांपासून खाद्य, चारा, पाणी इत्यादींच्या माध्यमातून होतो.

**लक्षणे** : बाधित जनावरांमध्ये उच्च ताप व नाकातून तसेच डोळ्यांतून चिकट स्राव किंवा पाणी वाहते, तोंडातून लाळ गळते, डोळे लाल होतात, हगवण होते. खाणे- पिणे अचानक बंद होऊन जनावर अस्वथ होते. घशाखाली गळ्याला सूज येऊन घोरल्यासारखा आवाज येतो, श्वसोच्छ्वास करण्यास त्रास होतो, खोकला येतो तसेच गाभण जनावरांचा गर्भपात होतो. सुरूवातीस उपचार केल्यास प्रतिसाद चांगला मिळतो; परंतु १२-२४ तासांत उपचार न केल्यास मृत्यू होण्याची दाट शक्यता असते.

**उपचार** : आजारी जनावरांना या रोगाची अशा प्रकारची लक्षणे आढळल्यास तज्ञ पशुवैद्यकाच्या सहाय्याने प्रतिजैविके, ताप व सूज कमी करणाऱ्या तसेच इतर औषधांचा उपचार २ ते ७ दिवस त्वरित करून घ्यावा. रोग पूर्णपणे बरा होईपर्यंत उपचार चालू ठेवावा.

**प्रतिबंधात्मक उपाय** : कळपातील बाधित जनावर इतर निरोगी जनावरांपासून वेगळे करावे. बाधित मृत जनावराची (जमिनीत पुरून किंवा जाळून) योग्य विल्हेवाट लावावी.

गोठे व आजुबाजूचा परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा, तसेच नवीन जनावरेदेखील बाजारातून आणू नयेत व आणल्यास पशुवैद्यकाच्या सहाय्याने निरोगी असल्याची खात्री करावी.

**फऱ्या**

फऱ्या हा रोग क्लॉस्ट्रिडियम चोव्हॉय नावाच्या जिवाणूमुळे होत असून, हा तीव्र स्वरुपाचा संसर्गजन्य रोग आहे. या रोगात फऱ्याजवळ सूज येते, यामुळे या रोगास फऱ्या असे म्हणतात. या रोगाचे जिवाणू मातीत वास्तव्य करतात. या रोगाचे जिवाणू विष तयार करतात. रक्ताद्वारे हे विष शरीरात पसरून स्नायूत साठले जाते व बाधित जनावरात या रोगाची लक्षणे दिसू लागतात. या रोगास एकटांगी रोग असेही म्हणतात. मोठ्या जनावरांप्रमाणे हा रोग लहान जनावरांमध्येही होतो. हा रोग सांसर्गिक असून या रोगाचे जिवाणू संसर्ग झालेले खाद्य, पाणी, चारा इत्यादी माध्यमांतून निरोगी जनावरास बाधित करतात. तसेच बाधित जनावराच्या जखमेद्वारे देखील रोगप्रसार होऊ शकतो.



**लक्षणे** : या रोगात पायाच्या वरच्या भागात किंवा खांद्यावर सूज येणे, लंगडणे अशी लक्षणे दिसतात. त्या बाधित भागास दाबल्यास चरचर असा आवाज येतो. बाधित भागात कातडी निळी होते, गरम लागते, वेदना होतात व काही दिवसानंतर तो भाग वेदनाविरहित होतो. जखम फुटल्यास काळसर स्त्राव बाहेर येतो व त्यात बुडबुड्या येणारा हायड्रोजन सल्फाईड वायू तयार होऊन खराब वास येतो. या रोगात देखील उच्चताप असतो व जनावरांचे खाणे- पिणे थांबते तसेच अनियमित श्वासोच्छ्वास थोड्या प्रमाणात आढळतो. बाह्य लक्षणांवरून खात्रीपूर्वक निदान होऊ शकते. आजारी जनावरांच्या बाधित पायांच्या सुजेतील स्त्राव प्रयोगशाळेत पशुवैद्यकाच्या सहाय्याने परीक्षणासाठी पाठवावा व रोगनिदान करून घ्यावे.

**उपचार** : पशुपालकांनी कळपातील आजारी जनावरांचे रोगनिदान करून घ्यावे व आजारी जनावरांना या रोगाची वरीलप्रमाणे लक्षणे आढळल्यास तज्ञ पशुवैद्यकाच्या सहाय्याने प्रतिजैविके, ताप व सूज कमी करण्याची औषधे तसेच जखमेवरील उपचार २ ते ७ दिवस करावेत. सुरूवातीस उपचार केल्यास प्रतिसाद चांगला मिळतो, परंतु १२ ते ४८ तासांत उपचार न केल्यास जनावर दगावू शकते.

**प्रतिबंधात्मक उपाय** : आजारी जनावरांना निरोगी जनावरांपासून वेगळे करावे. मृत जनावरांची जमिनीत पुरून किंवा जाळून योग्य ती विल्हेवाट लावावी. जनावरांचा एकाच ठिकाणी वारंवार चरण्यास पाठवू नये. ज्या भागात हा रोग वारंवार होतो त्या भागात पशुपालकांनी पशुवैद्यकाच्या सहाय्याने पावसाळ्याच्या सुरूवातीस जूनमध्ये लसीकरण करून घ्यावे.

**फुप्फुसदाह**

फुप्फुसदाह हे अनेक रोगांचे लक्षण असून, सर्व वयोगटांतील दुधाळ जनावरे यास बळी पडतात. फुप्फसदाह हा रोग दुधाळ जनावरांसह इतर जनावरांमध्येही आढळतो. या आजारात फुप्फुसाचा दाह होतो म्हणून यास फुप्फुसदाह म्हणतात. हा आजार जिवाणू, विषाणू किंवा परोपजिवी यांच्या संसर्गामुळे होतो. हा रोग रोगग्रस्त जनावराच्या नाकातील स्त्रावाशी संपर्क आल्यास किंवा हवेमार्फत सुद्धा जंतुंचा संसर्ग होऊन या रोगाची बाधा निरोगी जनावरास होते.

**लक्षणे** : रोगग्रस्त जनावरास सर्दी होते, श्वासोच्छ्वास अनियमित असतो, खोकला व ताप येतो. जनावरास अशक्तपणा येऊन ते कळपाच्या मागे पडते.

**उपचार** : पशुवैद्यकाच्या सहाय्याने त्वरित उपचार करावा.

**प्रतिबंधात्मक उपाय** : रोगग्रस्त जनावरास कळपातून वेगळे करावे, त्वरित उपचार करून घ्यावा. गोठ्यात अस्वच्छता ठेवू नये व जनावरांची संख्या योग्य प्रमाणात ठेवावी. पावसाळ्यात किंवा हिवाळ्यात गोठ्यात खूप गार वारा येत असेल तर गोठ्याच्या आजूबाजूला सर्व बाजूंनी बारदान बांधावे.

अशा प्रकारे दुधाळ जनावरांमध्ये उद्‌भवणाऱ्या महत्वाच्या रोगांसंबंधी माहिती आपण या लेखात पाहिली. त्यामुळे जनावरास यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्यास पशुपालकांनी जनावरांची योग्य काळजी घेतली व पशुवैद्यकाच्या सहाय्याने लवकरात लवकर उपचार केले तर रोग लवकर नियत्रंणात येईल; होणारे नुकसान टळण्यास मदत होईल. ■